# जनसंपर्क अधिकारी

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय
रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं. ०२२-२९४५१००१
Mail ID- pro cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक :- ७५-२३** **दिनांक :- ०४/०३/२०२३**

## दरोडयासह मोक्का केसमधील ६ वर्षापासुन पाहिजे असलेल्या आरोपीतास मध्यप्रदेश राज्यातुन अटक - मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेची कामगिरी

दिनांक ०३/०९/२०१८ रोजी फिर्यादी सैतानलाल हरदेव गुजर हे रात्री तळोजा ते जयपुर मार्गे २९ टन कॉपर त्यांच्या ताब्यातील ट्रेलर वाहन क्र. आर. जे. ०९. जी. बी. २८४८ मधुन घेवून जात असताना रात्री ११.३० वाजता चे सुमारास खानिवडे टोल नाक्याचे पुर्वी आरोपीत इसम यांनी त्यांच्या कडील खाजगी गाडया ट्रेलर समोर आडव्या लावुन फिर्यादी व क्लिनर यांना खाली उतरवुन जबरदस्तीने त्यांच्या खाजगी वाहनामध्ये बसविले व त्यांना चिबींपाडा, भिवंडी, चिंचोटी व परत भिवंडी नंतर धुमाळनगर असे फिरवुन नंतर वसई येथे उतरविले व फिर्यादी यांचे ताब्यातील ट्रेलर गाडी, २९ टन कॉपर व त्यांचा मोबाईल असा एकुण ०१, ६३, ०९, ६११/- रुपये किंमतीचा मुद्देमाल आरोपीत यांनी आपसात संगणमत करुन दरोडा घालुन जबरदस्तीने चोरुन नेलेबाबत फिर्यादी यांनी तक्रार दिल्याने विरार ठाणेत गु. रजि. नं. ९६३/२०१८ भा.द.वि.सं. कलम ३९५, ३६३, १२० (ब) सह एम.सी.ओ.सी. ३ (१), ३ (२), ३ (४) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हयातील पाहिजे आरोपी यांचा शोध घेवुन अटक करणेबाबत वरिष्ठांनी दिलेल्या सुचना व मार्गदर्शनाप्रमाणे मध्यवर्ती गुन्हे शाखेचे अधिकारी व अंमलदार यांना वर नमुद गुन्हयामधील आरोपी नामे राकेशसिंह उदयसिंह राजवत कुशवाह हा गेले ६ वर्षापासुन पाहिजे आरोपी असल्याचे निदर्शनास आले. त्यानुसार सहा पोलीस निरीक्षक दत्तात्रय सरक यांनी नमुद आरोपीबाबत गुप्त बातमीदार व तांत्रिक विश्र्वेशनाव्दारे प्राप्त माहितीच्या आधारे आरोपीत नामे राकेश सिंह उदयसिंह राजावत उर्फ कुशवाह, वय ४८ वर्ष, रा. बी.टी.आय रोड, महावीर नगर, ग्राम पांढरी, पो.स्टः उमरी, जिल्हा भिंड, राज्य मध्यप्रदेश यांस सापळा करवाई करुन मध्यप्रदेश राज्यातुन दिनांक ०३/०३/२०२३ रोजी ताब्यात घेतले. नमुद आरोपीताकडे कौशल्यपुर्ण तपास केला असता त्याचा वर नमुद गुन्हयात सहभाग असल्याचे निषन्न झाले. नमुद गुन्हयातील यापुर्वी अटक आरोपीत याचे विरुध्द मोक्का कायदयतर्गत कारवाई करण्यात आली असुन त्याचा मोक्का कोर्ट केस नं ०३/२०१९ असा आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास विरार पोलीस ठाणे करीत आहे.

सदरची कामगिरी श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे, सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे), यांच्या मार्गदर्शनाखाली मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेचे पो. नि. श्री. राहुल राख, स.पो.नि. दत्तात्रय सरक, पो.हवा. शिवाजी पाटील, गोविंद केंद्रे, महेश वेल्हे, पो.अंम. हनुमंत सुयवंशी सर्व नेमणुक मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखा तसेच स.फौ.संतोष चव्हाण, नेम- सायबर सेल यांनी केली आहे.

-----ooo-----